॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी धैर्य आणि सातत्य आवश्यक आहे.




अहिल्यानगर | सोमवार, दि. २ जून २०२५ | वर्ष ६ वे | अंक ४९ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# यंदाचा नाशिक सिंहस्थ कुंभमेळा ६३२ दिवसाचा

## ३१ ऑक्टोबर २०२६ पासून कुंभमेळा पर्वाला सुरुवात | पहिले शाही स्नान २ ऑगस्ट २०२७ ला

**नाशिक | वीरभूमी–**
कुंभमेळा सुरक्षित, निर्मळ आणि पवित्र वातावरणात होण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्यात येईल. कुंभमेळा भारतीय सनातन संस्कृतीचे प्रतीक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष याकडे आहे. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने जग स्तिमित होईल असे भव्य दिव्य आणि स्मरणीय आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यातील अमृत स्नानाचे दिवसही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

साधू-महंतांच्या उपास्थितीत कुंभमेळ्याच्या तारखांची घोषणा होणे ही खऱ्या अर्थाने कुंभपर्वाची सुरूवात आहे, असे नमूद करू मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, कुंभमेळ्याचे संचलन आखाडे, साधू -महंत करतात, राज्य शासन सेवक म्हणून अधिकाधिक चांगली सुविधा देण्याचा प्रयत्न करते. यावेळी देखील शासनातर्फे



उत्तम सुविधा उभारण्यात येतील. कुंभमेळ्याबाबत साधू महं तांचा अनुभव मोठा आहे, त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. २०१५ मध्ये तयारीसाठी कालावधी कमी होता. यावेळी पूर्व तयारीसाठी अधिक कालावधी असल्याने शासन चांगली तयारी करीत आहे.

गोदावरी निर्मळ राहावी आणि कायम प्रवाही राहावी हेच कुंभचे उद्दिष्ट असून तसा शासनाचा प्रयत्न आहे. गोदावरीचे पावित्र्य अबाधित राखण्यासाठी उपायोजना करण्यात येत आहेत. गोदावरीत जाणारे पाणी स्वच्छ असावे यादृष्टीने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निविदा काढण्यात येत आहेत. नदी पात्रात अशुद्ध पाणी जाऊ नये असे प्रयत्न करण्यात येतील. नदी प्रवाहित राहिल्यास शुद्ध राहील, त्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे कुंभ आणि त्यानंतरही गोदावरीचे जल निर्मळ राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

साधू-महंतांच्या सूचना लक्षात घेवून शासन आवश्यक नियोजन करेल, असे नमूद करतांना श्री.फडणवीस पुढे म्हणाले, आखाड्यासाठी आवश्यक सुविधा उपालब्ध करून देण्यात येतील. साधूग्रामची जागा कायमस्वरूपी उपयोगात यावी यासाठी जमिन अधिग्रहित करण्यात येईल. कुंभमेळ्यासाठी शहरात रस्त्याचे जाळे तयार करण्यात येत आहे. कुशावर्त येथे गर्दी होऊ नये यासाठी योग्य नियोजन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, यावेळी सिंहस्थ कुंभमेळ्यात अधिक भाविक येण्याची शक्यता असल्याने गर्दी नियंत्रणाचे मोठे आव्हान असणार आहे. तीन अमृत स्नानसोबत इतर पर्वस्नान होणार आहेत. कुंभमेळ्याची कामे वेगाने सुरू असून ४ हजार कोटींपेक्षा अधिक कामाच्या निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. लवकरच २ हजार ६०० कोटींच्या निविदा काढण्यात येणार आहेत. ही सर्व कामे जानेवारी २०२७ पूर्वी पूर्णत्वास येतील. या कामांसाठी सर्व आखाड्यांचे चांगले सहकार्य मिळत आहे. सर्वांच्या सहकार्याने यंदाचा नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा चांगला आणि सुरक्षित होईल. इथे येणाऱ्या साधू-महंतांना सुखद आणि पावन अनुभव येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी विविध आखाड्याच्या साधू-महंतांनी कुंभमेळा आयोजनाबाबत सूचना केल्या. यावेळी श्री रामानंद निर्मोही आखाडा, निर्मोही अनी आखाडा, श्री दिगंबर अनी आखाडा, निर्वाणी अनी आखाडा श्री पंचायती उदासीन आखाडा, श्री पंचायती नया उदासीन आखाडा, श्री पंचायती निर्मल आखाडा, श्री पंचायती अटल आखाडा, श्री पंचायती महानिर्वाणी आखाडा, श्री पंच अग्नी आखाडा, यांच्यासह विविध आखाड्यांचे पदाधिकारी, नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश शुक्ल, पुरोहित संघाचे त्र्यंबकेश्वर येथील अध्यक्ष मनोज थेटे आदी उपस्थित होते.

### नाशिक कुंभमेळा

- सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ- शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६, दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी (स्थळ-रामकुंड पंचवटी)
- प्रथम अमृतस्नान-सोमवार २ ऑगस्ट २०२७,आषाढ सोमवती अमावस्या.
- महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान- मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या
- तृतीय अमृतस्नान-शनिवार ११ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध एकादशी

### त्र्यंबकेश्वर कुंभमेळा

- सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ- शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६,
- प्रथम अमृतस्नान-सोमवार २ ऑगस्ट २०२७, आषाढ सोमवती अमावस्या.
- महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान- मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या
- तृतीय अमृतस्नान-शनिवार १२ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध द्वादशी (वामन द्वादशी).

## SPOT NEWS

### व्यावसायिक गॅस २४ रुपयांनी स्वस्त

**नवी दिल्ली** – रविवार दि. १ जूनपासून देशभरात एलपीजी सिलिंडरच्या किमती कमी झाल्या आहेत. तेल विपणन कंपन्यांनी (ओएमसी) गॅस सिलिंडरच्या किमतीत मोठी कपात केली आहे. यामुळे आता १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमती सुमारे २४ रुपयांनी कमी झाल्या आहेत. रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि ढाबे आदींना याचा फायदा होईल. कारण येथे हे सिलिंडर मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. या व्यवसायिक सिलिंडरच्या किमती कमी झाल्याने, व्यवसायासाठीचा खर्च कमी होईल. परिणामी ग्राहकांना चांगली सेवा मिळू शकेल. महत्वाचे म्हणजे, घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. खरे तर, या व्यावसायिक सिलिंडरचे दर सलग तिस-या महिन्यात कमी झाले आहेत. यापूर्वी मे महिन्यात १४.५ रुपयांनी तर एप्रिल महिन्यातही ४१ रुपये या सिलिंडरचे दर कमी करण्यात आले होते.

### पंजाबची अंतिम फेरीत धडक

**नवी दिल्ली** – कर्णधार श्रेयस अय्यरच्या ४१ चेंडूत ८७ धावांच्या जोरदार पंजाबने क्वालिफायर २ च्या सामन्यात तगड्या मुंबईला पराभूत करीत थेट अंतिम फेरीत धडक मारली. आता त्यांचा सामना बंगळुरू संघासोबत दि. ३ जून रोजी होणार आहे. त्यामुळे आता यंदाच्या आयपीएलचा विजेता कोण ठरणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना मुंबईच्या जॉनी बेअरस्टो याच्यासह तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांची जोरदार फटकेबाजी आणि त्यानंतर हार्दिक पंड्या आणि नमन धीर यांची दमदार फलंदाजी याच्या जोरावर मुंबईच्या संघाने दहाच्या सरासरीने धावा जमवत मुंबईने २० षटकांत ६ गडी गमावून २०३ धावा केल्या. परंतु त्यानंतर पंजाबच्या संघानेही जशास तसे प्रत्युत्तर देत जोरदार फटकेबाजी केली. त्यामुळे सामन्यात अखेरपर्यंत चुरस राहिली आणि अटीतटीच्या सामन्यात पंजाबने अंतिम फेरीत धडक मारली. आज क्वालिफायर मॅच सुरू होण्यापूर्वीच जोरदार पाऊस झाला, त्यामुळे सामना होणार की नाही, अशी स्थिती निर्माण झाली होती. परंतु पाऊस थांबल्यानंतर २० षटकांचाच सामना झाला आणि चुरशीच्या सामन्यात पंजाबने शानदार विजय मिळवित थेट अंतिम फेरीत झेप घेतली. या विजयात पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरचा मोठा वाटा आहे. आता दि. ३ जून रोजी आरसीबी आणि पंजाबमध्ये अंतिम लढत रंगणार आहे.

# राज्यात पावसाची गती मंदावली

**पुणे | वीरभूमी–**
महाराष्ट्रात यंदा मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला. मे महिन्यात राज्यात मान्सून पोहचण्याचा विक्रम झाला. तसेच मे महिन्यात मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नदी, नाले दुथडी भरुन वाहू लागले. परंतु आता राज्यात पावसाची गती मंदावली आहे. पुढील १२ जूनपर्यंत पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. मुंबईत शनिवारी रात्री पावसाच्या तुरळक सरी पडल्या. मात्र, रविवार वातावरणात पावसाची चिन्हं नव्हती.

राज्यात मान्सूनने जोरदार सुरुवात केली असली तरी आता त्याची गती मंदावली आहे. नैऋत्य मोसमी वा-यांनी यंदा वेगाने वाटचाल करत देशात लवकर आगमन केले. २६ मे रोजी राज्यात दाखल झालेल्या पावसाने कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली. मात्र, गेल्या चार दिवसांपासून अनेक भागांत पावसाने विश्रांती घेतली आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या मान्सूनचे प्रवाह कमकुवत झाले आहे. त्यामुळे राज्यात पावसाचे प्रमाण कमी होणार आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात तुरळक ठिकाणीच हलक्या सरी पडणार आहेत. विदर्भात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यात मे महिन्यात मुसळधार पाऊस झाला. पण गेल्या ४८ तासांपासून मान्सून थांबला आहे.

# सरकारच्या तिजोरीत विक्रमी २.०१ लाख कोटींचा जीएसटी

**नवी दिल्ली | वीरभूमी–**
केंद्र सरकारने मे २०२५ चे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाचे आकडे जाहीर केले आहेत. सरकारी अहवालानुसार, या महिन्यात एकूण जीएसटी संकलन २.०१ लाख कोटी रुपये होते, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत १६.४ टक्क्यांनी जास्त आहे. पण, मासिक आधारावर यात घट झाली आहे. एप्रिल २०२५ मध्ये हा आकडा २.३७ लाख कोटी रुपये होता, जो आतापर्यंतचा सर्वोच्च आहे. म्हणजेच एप्रिलच्या तुलनेत मे महिन्यात जीएसटी संकलनात सुमारे ३६,००० कोटी रुपयांची घट झाली आहे.

सरकारी आकडेवारीनुसार, मे २०२५ मध्ये केंद्र सरकारला ३५,४३४ कोटी रुपये महसूल मिळाला, तर राज्य सरकारांना ४३,९०२ कोटी रुपये महसूल मिळाला. याशिवाय, १.०९ लाख कोटी रुपयांचा एकात्मिक जीएसटी (आयजीएसटी) आणि १२,८७९ कोटी रुपयांचा उपकर गोळा झाला आहे. एकूणच, हे संकलन भारताच्या कर प्रणालीची ताकद आणि आर्थिक घडामोडींमध्ये सतत सुधारणा दर्शवते.

यावेळी जीएसटी महसुलात देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणारी रक्कम १३.७ टक्क्यांनी वाढून १.५० लाख कोटी रुपये झाली आहे, तर आयातीतून मिळणारा महसूल २५.२ टक्क्यांनी वाढून ५१,२६६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की, देशांतर्गत वापर आणि आयातीमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे, ज्यामुळे कर संकलन वाढले आहे. पण, या कालावधीत परतफेडीच्या रकमेत घट दिसून आली आहे. मे २०२५ मध्ये एकूण २७,२१० कोटी रुपयांचा जीएसटी परतावा जारी करण्यात आला, जो वार्षिक आधारावर ४ टक्के कमी आहे. जर आपण परतफेडीकडे पाहिले तर निव्वळ जीएसटी संकलन १.७४ लाख कोटी रुपये झाले आहे, जे गेल्या वर्षीच्या याच कालावधीपेक्षा २०.४ टक्के जास्त आहे.

राज्य पातळीवर बोलायचे झाले तर, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि तामिळनाडूसारख्या मोठ्या राज्यांमध्ये जीएसटी संकलन १७ ते २५ टक्क्यांनी वाढले आहे. तर, गुजरात, आंध्र प्रदेश आणि तेलंगणासारख्या राज्यांमध्ये ही वाढ तुलनेने(सुमारे ६ टक्के) कमी होती. याशिवाय, मध्य प्रदेश, हरियाणा, पंजाब आणि राजस्थानसारख्या राज्यांमध्ये सरासरी १० टक्के वाढ झाली आहे.

# रायगड किल्ल्यावर उत्खननात आढळले सौम्ययंत्र खगोलशास्त्रीय उपकरण

## रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांची माहिती

**कोल्हापूर | वीरभूमी–**
दुर्गराज रायगडाचे बांधकाम करताना खगोलशास्त्रीय अभ्यास करून तत्कालीन अत्याधुनिक आणि शास्त्रोक्त पद्धतीचा वापर झाल्याचा महत्वाचा पुरावा उघड झाला. रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी रविवारी सोशल मिडियावरुन ही माहिती जाहीर केली.

दुर्गराज रायगड येथे भारतीय पुरातत्त्व विभाग व रायगड विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उत्खनन प्रक्रियेमध्ये गडावर प्राचीन हे 'यंत्रराज सौम्ययंत्र' हे खगोलशास्त्रीय उपकरण सापडले आहे.

भारतीय पुरातत्व विभाग आणि रायगड विकास प्राधिकरणाकडून गेल्या तीन ते चार वर्षापासून रायगडाच्या रोपवे अप्पर स्टेशनची मागील बाजू, कुशावर्त तलाव, बाजारपेठ, जगदीश्वर मंदिर या भागांमधे जे शिवकालीन वाड्यांचे अवशेष आहेत, अशा जवळपास १० ते १२ विविध ठिकाणी हे उत्खनन सुरु होते. कुशावर्त तलावाच्या वरील भागात तसेच पर्जन्यमापक आणि वाडेश्वर मंदिराच्या मध्यभागात असलेल्या ऐतिहसिक वाड्याच्या जागेवर उत्खनन करताना हे यंत्रराज, सौम्ययंत्र खगोलशास्त्रीय उपकरण सापडले.

दुर्गराज रायगडाचे बांधकाम करताना खगोलशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी या यंत्राचा वापर झाला असण्याची शक्यता आहे. या अमूल्य ठेवल्यामुळे इतिहास अभ्यासकांना पुढील संशोधनासाठी खूप मोठी संधी उपलब्ध झाली आहे. –संभाजीराजे छत्रपती, अध्यक्ष, रायगड विकास प्राधिकरण.

या यंत्राजवरच्या वरील बाजूस काही अक्षरे कोरलेली आहेत. मध्यभागी एक कासव, सापासारख्या दोन प्राण्यांचे छाप आहेत. त्यांचे मुख आणि शेपटी कुठल्या दिशेला असावी, हे समजण्यासाठी वरील बाजूस मुख आणि पूंछ अशी अक्षरे सुद्धा कोरलेली आहेत. यावरून उत्तर आणि दक्षिण दिशा कुठे असावी, याचा अंदाज बांधला जात होता.

प्राचीन कालखंडापासून ग्रहताऱ्यांच्या अभ्यासासाठी, दिशांचा वेध घेण्यासाठी तसेच वेळ मोजण्यासाठी अस्ट्रोलॅब म्हणजे प्राचीन यंत्रराज, सौम्ययंत्र हे खगोलशास्त्रीय उपकरण वापरले जात होते. विशेषत: अक्षांश, रेखांश, कर्कवृत्त, विषुववृत्त यांसारख्या गोष्टींचा अभ्यास करणे यामुळे सोपे जात असे.



# SPOT NEWS

## संगमनेरात महेश नवमी निमित्त सप्ताहभर विविध उपक्रमांचे आयोजन

● **संगमनेर । वीरभूमी –**

अखिल भारतीय स्तरावर माहेश्वरी समाजाच्या वंशोत्पत्ती दिन म्हणून साजऱ्या होणाऱ्या महेश नवमी निमित्त संगमनेर तालुका माहेश्वरी सभा आणि सहयोगी संस्थांच्या वतीने १ जून ते ९ जून २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तालुकाध्यक्ष श्रीनिवास भंडारी आणि सचिव जुगलकिशोर बाहेती यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. माहेश्वरी पंच ट्रस्टचे अध्यक्ष व मालपाणी उद्योग समूहाचे संचालक गिरीश मालपाणी यांनी सर्व समाजबांधवांना महेश नवमी उत्सवासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. या उत्सवाच्या आयोजनामध्ये माहेश्वरी समाजातील सर्व वयोगटांतील सदस्यांना सहभागी करून घेणारे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. स्पर्धांसाठी एकूण ५० हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली असून, सर्व स्पर्धांचे मुख्य प्रायोजक म्हणून मालपाणी उद्योग समूहाने पुढाकार घेतला आहे. याशिवाय प्रदेश कार्यकारिणी सदस्य सतीश बाहेती हे देखील महेश नवमी उत्सव यशस्वी करण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहेत. ४ जून रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर बालाजी मंदिरात महेश भगवान यांना अभिषेक होणार आहे. या अभिषेकाचे यजमान पल्लवी-शैलेश कासट व शिवानी-कृष्णा आसावा हे असतील. शोभायात्रेनंतर अल्पोपहाराची सेवा श्रीनिवास आणि राजेंद्र सोमाणी (राजेंद्र उद्योग समूह) यांच्यातर्फे दिली जाणार असून, रसपान सेवा 'युवा महेश' या संघटनेने स्वीकारली आहे. ९ जून रोजी खांडगाव येथे महेश भगवान अभिषेकाचे आयोजन करण्यात आले असून, याचे यजमान कलावती-सोमनाथ चांडक आणि ज्योती-संतोष चांडक हे असतील. याच दिवशी श्री खांडेश्वर मंदिर, खांडगाव येथे महेश्वरी समाजाचे 'गेट टू गेदर' आणि 'म्युझिकल हौजी गेम' चा समारंभपूर्वक समारोप होणार आहे. शोभायात्रा व गेट टू गेदरच्या नियोजनाची जबाबदारी राजस्थान युवक मंडळाने स्वीकारली आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये माहेश्वरी पंच ट्रस्ट, माहेश्वरी महिला मंडळ, राजस्थान युवक मंडळ, युवा महेश, आणि अन्य सहयोगी संस्थांचा मोलाचा सहभाग आहे. समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध उपक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहन उपाध्यक्ष संजय रा. मालपाणी, कोषाध्यक्ष सुजितकुमार खटोड, संघटन मंत्री सचिन मणियार, सहसचिव जयप्रकाश भुतडा, पंच ट्रस्ट अध्यक्ष गिरीश मालपाणी, सरपंच विश्वनाथ कलंत्री, उत्सव समिती प्रमुख अतुल झंवर, प्रकल्प प्रमुख सुमित अट्टल, वेणुगोपाल कलंत्री आणि सिद्धांत झंवर यांनी केले आहे.

## गणेशवाडीतील विहिरीत पडलेला बिबट्या जेरबंद

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

तालुक्यातील गणेशवाडी शिवारात विहिरीतप ड ल े ल ा बिबट्या जेरबंद करण्यात यश आले. शेती गट नं. ३०२ मध्ये काही महिला शेतात काम करत असताना त्यांना वळ असलेल्या विहीरीत गुरगरण्याचा आवाज आला. त्यांनी विहिरीत डोकावून पाहीले असता आतमध्ये बिबट्या पडला असल्याचे निदर्शनास आले. वनविभागास कळविल्यांनतर त्यांचे पथक हजर झाले. पथकात वैभव गाढवे, राहुल सिसोदे, नेवासा वनरक्षक दामोधर धुळे, कर्मचारी श्री. गाढे, संदिप ठोंबरे यांनी बिबट्या जेरबंद करण्यासाठी चार तास परिश्रम घेतले. अथक परिश्रमानंतर बिबट्याला जेरबंद करण्यात यश आले. सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी, सहाय्यक फौजदार अंकुश दहिफळे, हवालदार बाळासाहेब बाचकर, कॉस्टेबल ज्ञानेश्वर आघाव, ज्ञानेश्वर जावळे यांनी बंदोबस्त ठेवला.

# श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्धाराचे भूमिपुजन

### आ. आशुतोष काळे यांचेकडून कहार समाजाची मागणी पूर्ण

● **कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव शहरात श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वार व्हावे, अशी कहार समाजाची मागील अनेक वर्षापासूनची मागणी होती. सर्व समाजाच्या नागरीकांना समाज मंदिर आणि सभागृहासाठी आवश्यक निधी दिला आहे. त्याप्रमाणे मागील अनेक वर्षापासूनची कहार समाजाची मागणी व त्यांच्या धार्मिक भावनांची दखल घेवून स्थानिक विकास निधीअंतर्गत श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वाराची मागणी पूर्ण केली असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.



कोपरगाव शहरात आमदार स्थानिक विकास निधीअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वाराचे भूमिपूजन रविवार (दि.१) रोजी आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, कोपरगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा नेहमीच प्रयत्न राहिलेला आहे. कहार समाजाच्या मागणीस प्राधान्य देवून कोपरगाव शहरात उभारल्या जाणाऱ्या श्री मुंबादेवी प्रवेशद्वार कोपरगाव शहराच्या श्रद्धा व संस्कृतीचे प्रतीक ठरणार असून या श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वारामुळे कोपरगाव शहराच्या वैभवात भर पडणार आहे. नागरीकांना अपेक्षित असलेले कोपरगाव मतदार संघाबरोबरच कोपरगाव शहरातील सर्व विकासकामे लवकरच पूर्ण होणार असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते, व्यापारी व कहार समाज बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर या आदर्श राज्यकर्त्या : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

● **संगमनेर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्याची सुकन्या असलेल्या अहिल्यादेवी होळकर यांचे देशाच्या सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय क्षेत्रात मोठे योगदान असून सर्व जाती धर्माच्या जनतेला सोबत घेऊन पाण्याचे महत्त्व ओळखून जल व्यवस्थापनामध्ये मोठी क्रांती घडवणाऱ्या अहिल्यादेवी होळकर या देशातील आदर्श राज्यकर्त्या होत्या असे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

संगमनेर मध्ये आशीर्वाद पतसंस्थेसमोर ३०० वी जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बाबासाहेब ओहोळ, शंकरराव खेमनर, रणजितसिंह देशमुख, विश्वासराव मुर्तडक, रामहरी कातोरे, अर्चना बालवडे, रामदास धुळगंड, भास्कर शर्माळे,अण्णा राहिंज, इंद्रजीत खेमनर, तुकाराम दातीर, सचिन खेमनर, ॲड अशोक हजारे, माधव खेमनर, गोविंद खेमनर, ज्ञानेश्वर ढोले, राहुल खेमनर, चांगदेव खेमनर, हौशीराम वाघमोडे, अनिल कांदळकर, अविनाश शिंदे, सुभाष हळनोर, एस. एम. खेमनर, भास्कर खेमनर, अण्णासाहेब कुदनर, दीपक धुळगंड, ज्ञानेश्वर ढोणे, सचिन राहींज, राहुल खेमनर आदी उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, देशाच्या राजकारणात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी निर्माण केलेल्या इतिहासाचे अवलोकन करावे इतका अभिमानास्पद हा इतिहास आहे. भारतामध्ये ज्या महिला राज्यकर्त्या होऊन गेल्या त्यामध्ये आदर्श राज्यकर्त्या म्हणून पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांचा गौरव होतो.

मल्हारराव होळकर यांनी चौंडी येथील मुक्कामामध्ये अहिल्यादेवी यांना हेरले आणि आपली सून केली खंडेरावांच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी अत्यंत आदर्श पणे राज्यकारभार सांभाळला. पाण्याचे महत्व ओळखून गावोगावी विहिरी बंधारे बारव निर्माण केले दक्षिणेत रामेश्वर पासून उत्तरेत केदारनाथ आणि पश्चिमेला सुरटी सोमनाथ पासून आसाम पर्यंत विविध धार्मिक स्थळांवर त्यांनी घाट बांधले. चारीधाम बारा ज्योतिर्लिंग कुंभमेळ्याची चार ठिकाणी या ठिकाणी मंदिरे उभारली गावोगावी न्याय देण्याची व्यवस्था उभारली पोलीस प्रशासन धर्मशाळा पानवटे निर्माण केले.

## अन्न, औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त हेमंत मेतकर यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

● **नगर । वीरभूमी–**

अन्न व औषध प्रशासन अहिल्यानगरचे सहाय्यक आयुक्त हेमंत मेतकर यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल अहिल्यानगर जिल्हा, शहर व तालुका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. मेतकर यांच्या उत्कृष्ट कार्यपध्दतीचे केमिस्ट असोसिएशनच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले.



नवीपेठ येथील केमिस्ट भवन येथे अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त अशोक बर्डे यांच्या अध्यक्षतेखाली हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी औषध निरीक्षक जावेद शेख, सौ. गीता मेतकर, कु. साक्षी मेतकर, सोहम मेतकर, केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, प्रशांत उबाळे, सचिन शिंदे, भरत सुपेकर, अमित धाडगे, राजेंद्र बलदोटा, मनोज खेडकर, अतुल चांगले, महेश आठरे, अशोक बलदोटा, अनिल गांधी, आशुतोष कुकडे, अवधुत बोरुडे, सुधाकर इंगळे, सचिन ढगे, सागर फुलसौंदर, नितीन सातपुते, अनिल क्षीरसागर, कमलेश गुंदेचा, महेश अनमल, प्रविण गुंडू, नवनीत मुनोत, विशाल नातू आदींसह जिल्ह्यातील केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात राजेंद्र बलदोटा यांनी अन्न व औषध प्रशासन अहिल्यानगरचे सहाय्यक आयुक्त हेमंत मेतकर यांनी अधिकार गाजवण्यापेक्षा सर्वांना मार्गदर्शनाची भूमिका ठेवली. सर्वांना सहकार्य केले. निष्कलंक असलेला व्यक्तीमत्व सेवानिवृत्तीनंतरही हवाहवासा वाटतो, हीच त्याने केलेल्या कार्याची पावती असल्याचे त्यांनी सांगितले.

दत्ता गाडळकर म्हणाले की, हेमंत मेतकर यांनी केमिस्ट बांधवांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम केले. त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केल्याने अनेक केमिस्ट बांधव उत्तम प्रकारे सेवा देत आहेत. कारवाई करण्यापेक्षा व्यवस्थित काम कसे करून घेता येईल? याकडे त्यांनी विशेष लक्ष देवून उत्तम प्रकारे काम करवून घेतले असल्याचे स्पष्ट करुन त्यांच्या भावी वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित धाडगे यांनी केले. आभार मनोज खेडकर यांनी मानले. यावेळी संजीव गुंदेचा, बाळासाहेब सोनवणे, नवनीत मुनोत, प्रवीण गुंडू, ऋषिकेश कुक्कडवाल, रामप्रसाद काळे, दत्तात्रय देशमुख, अविनाश साळुंके, प्रकाश मुथा, अजय घोडके, पोकळे विनीत, रीनुल गवळी, अजय घोडके, भूपेंद्र खेडकर, मनमोहन बहुरूपी, हर्षल अष्टेकर, दिलीप पालवे, मनोज बाफना, विनीत जाधव, झावरे, प्रणव जाधव, प्रणव अमले आदी केमिस्ट बांधव उपस्थित होते.

# वाढदिवसानिमित्त निसर्गाचे संरक्षण, जलजागृती व विधायक कार्याचा संकल्प

### वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सदस्यांचा संकल्प । ग्रुपच्या सदस्यांचा एकत्रितपणे निसर्गाच्या सानिध्यात वाढदिवस साजरा

● **पाथर्डी । वीरभूमी–**

एक जून म्हणजे सरकारी वाढदिवस. या दिवशी वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सदस्यांनी ग्रुप मधील सदस्यांचा सामूहिक वाढदिवस निसर्गाच्या सानिध्यात साजरा करत निसर्गाचे संरक्षण, जल जागृती अभियान व विधायक कार्याचा संकल्प सर्वांनी सामूहिकपणे व्यक्त केला. अशा आगळ्यावेगळ्या वाढदिवसाची शहर व तालुक्यात चर्चा सुरू आहे.

शहरालगत वनदेव निसर्ग परिचय केंद्र असून सकाळ सायंकाळी येथे हजारो स्त्री-पुरुष फिरायला, व्यायाम, योग प्राणायाम व निसर्गाशी एकरूप होण्यासाठी येतात. अत्यंत आरोग्यपूर्ण वातावरण, प्रदूषण मुक्त परिसर यामुळे या भागात फिरायला येणाऱ्यांची संख्या अधिक आहे. वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुप हा ग्रुप गेल्या वीस वर्षांपासून कार्यरत असून शहरातील सर्व थरातील व्यावसायिक, उद्योजक, डॉक्टर, वकील, व्यापारी, पत्रकार असे या ग्रुपचे सदस्य आहेत. पोलीस व प्रशासनातील अन्य अधिकारी सुद्धा आवर्जून या ग्रुपमध्ये सहभागी होतात. वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, पशुपक्षी रक्षण यासाठी लोकसहभागातून पाणी व अन्नपदार्थ वर्षभर सदस्यांकडून पुरविले जातात. एक जून या दिवशी प्राथमिक शाळेमध्ये गुरुजींनी अंदाजाने लिहिलेली जन्मतारीख तीच पुढे कायम होऊन या दिवशी वाढदिवस साजरा होतो.

कौटुंबिक भावनेने एकत्र राहत विधायक व धार्मिक कार्यात वाहून घेतलेल्या ग्रुपने आपल्या सहकाऱ्यांचा वाढदिवस एकत्रितपणे साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला. सकाळी फिरण्याच्या वेळी सर्वजण वनदेव मंदिर परिसरात जमले. हास्य विनोद, गाणी, नकला परस्परांना शुभेच्छा देत सन्मानाने पुष्पगुच्छ व फेटा बांधून सर्वांचा एकत्रित गौरव करण्यात आला. यावेळी शुभेच्छा देताना वारकरी संप्रदायाचे जेष्ठ उपासक शिवाजी वारे महाराज म्हणाले, दैनंदिन जीवन जगताना सर्वसामान्यपणे प्रत्येक व्यक्ती ताणतणावात जगत आहे. वनदेव परिसरात फिरायला येणाऱ्या हजारो नागरिकांना समाजकार्याची आवड या मित्रमंडळामुळे लागले आहे. २४ तासांपैकी किमान एक तास स्वतःसाठी काढा. एवढ्या एका साध्या ब्रीदवाक्यावर या मंडळाच्या सदस्यांनी सुरू केलेला हा उपक्रम तालुक्यात आदर्श ठरला आहे. वनविभाग, राज्य शासन, जिल्हा परिषद आदींच्या माध्यमातून येथील विकास कामात सदस्यांनी सक्रिय योगदान दिले आहे. आमदार मोनिका राजळे यांच्या शिफारशीमुळे वनविभागाला कोट्यवधींचा निधी या परिसराच्या विकासासाठी प्राप्त झाला. नुकतेच धामणगाव देवी मंदिर परिसरामध्ये व्यायामाचे साहित्य, पंचायत समितीच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात याच मंडळाने पुढाकार घेतला. धर्म, देश व कुटुंब व्यवस्था जगविण्यासाठी एकत्रितपणे काम करताना निसर्ग व सर्वच जीवसृष्टीचे रक्षण करण्याचा संकल्प मंडळाकडून करण्यात आला आहे. कुटुंबामध्ये आई-वडील हेच ईश्वर स्वरूप मानून त्यांची सेवा करा.



निसर्गाशी एकरूप व्हा. निसर्गाला कुटुंब माना. निसर्ग दोन्ही हाताने भरभरून देत आपले जीवन निरोगी व कृतार्थ करेल. या आगळ्यावेगळ्या उपक्रमातून निर्माण झालेली ऊर्जा सर्वच सदस्यांना वर्षभर पुरेल. येणारा काळ अतिशय कठीण व अटीतटीचा आहे. निव्वळ पैसा उपयोगाचा नाही, निव्वळ सत्ता उपयोगाची नाही, तर जिवाभावाची जोडलेली दोन माणसं हीच खरी संपत्ती ठरणार आहे. त्यासाठी समविचारी माणसांनी जन्मदिनाच्या दिवशी अनिष्ट पद्धतीने खर्च न करता अशा पद्धतीने संकल्प दिवस साजरा करण्याची गरज आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश मंत्री यांनी केले. सूत्रसंचालन योगेश घोडके यांनी केले तर माजी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे यांनी आभार मानले.

## SPOT NEWS



### वरुर वाचनालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती साजरी

**● शेवगाव । प्रतिनिधी–**

तालुक्यातील वरुर येथील शासनमान्य स्वर्गीय पार्वतीबाई गोसावी सार्वजनिक वाचनालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशाताब्दी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी सरपंच सचिन म्हस्के व वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ गोसावी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जयंती दिनाच्या निमित्ताने वाचक सभासदांच्या सक्रिय सहभागातून वाचनालयात ‘हॅलो अहिल्यानगरकर वाचत आहे’ हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी माजी सरपंच नामदेव तुजारे, सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन किशोर खांबट, संचालक उमेश खांबट, कल्याण म्हस्के, माणिक राऊत, अन्सार शेख, संतोष खांबट, शांतवन गरुड, गोविंद गरुड, किशोर तुजारे, बालवाचक महेश क्षीरसागर, विश्वजीत वावरे आदी उपस्थित होते. ग्रंथपाल प्रशांत गोसावी यांनी आभार मानले.

### एकास मारहाण; सोनईत गुन्हा दाखल

**● नेवासा । वीरभूमी–**

नेवासा तालुक्यातील सोनई येथे एकास मारहाण केल्याची घटना घडली. याबाबत दाखल फिर्यादीवरुन सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सागर म्हसु कुसळकर (वय ३१) यांनी फिर्याद दिली असून त्यात म्हटले की, दि. २९ रोजी आपल्या राहत्या घरासमोर असताना त्या ठिकाणी आरोपी शेंग्या उर्फ सौरभ राजभिव, सनी ऊर्फ मदन किसन शिंदे (सर्व रा. सोनई), विशाल ज्ञानदेव ब्राम्हणे (रा. शिंगणापूर फाटा) व इतर तीन अनोळखी इसम यांनी लोखंडी रॉड, तलवार, कत्ती व लाकडी दांडा तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले.

### अरुणाबाई देशमुख यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी–**



अकोले तालुक्यातील माळीझाप येथील रहिवासी असलेल्या अरुणाबाई उत्तमराव देशमुख (वय ७९ वर्षे) यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. त्या अतिशय मन मिळावु, धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पंचायत समितीचे सेवानिवृत्त तालुका विस्तार अधिकारी उत्तमराव देशमुख यांच्या त्या पत्नी होत. सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक राजीव देशमुख, आय. टी. अकोलेचे शिक्षक संदीप देशमुख, महेश देशमुख, श्रीदत्ता देशमुख यांच्या त्या मातोश्री होत. तर अभिनव शिक्षण संस्थेच्या कॅम्पस डायरेक्टर डॉ. जयश्री देशमुख, माध्यमिक शिक्षिका ज्योती देशमुख, सविता देशमुख व पल्लवी देशमुख यांच्या त्या सासूबाई होत. त्यांच्यावर उंचखडक बु. येथील स्मशानभूमी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# भांडणाचे नाही राहीले भाण त्याचा वाहनचालकांना झाला ताण

## करंजी घाटात दोन ट्रक चालकांचे भांडण । सुमारे पाऊण तास घाटातील वाहतूक ठप्प

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील करंजी घाटामध्ये शनिवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ओव्हरटेक करतांना झालेल्या नुकसानीमुळे दोन ट्रकच्या चालकांमध्ये घाटातच भांडण सुरु झाले. घाटातील रस्त्यावरच वाहने जागेवर उभी करुन दोन्ही चालकांमध्ये जोरदार शाब्दिक भांडण होवून काही वेळात हाणामारी झाली. मात्र दोन्ही ट्रक घाटातील रस्त्यावरच उभे असल्याने दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली. घाटातून प्रवास करणाऱ्या अनेक प्रवाशांना व वाहन चालकांना सुरुवातीला घाटात अपघात झाला असावा असे वाटले. परंतु काही वेळाने दोन ट्रक ड्रायव्हरचे रस्त्यावरच भांडण सुरू असल्याचे समजले. यामध्ये काही वाहन चालकांनी मध्यस्थी करत वाद मिटवल्यानंतर वाहतूक कोंडी दूर झाली.



नगर ते पाथर्डी रोडवरील करंजी घाटात अनेक धोकादायक वळणे आहेत. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग असल्याने वाहतूकही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातच घाटातील धोकादायक वळणामुळे अनेक वेळा अपघात होतात. विशेषतः जड वाहनांचे घाट उतरत असताना धोकादायक वळणावर हमखासपणे अपघात होतात. या अपघातामध्ये अपघातग्रस्त वाहनाचे मोठे नुकसान होते. त्याचबरोबर वाहन चालक देखील जखमी होतो. अनेक वेळा काहींना आपला जीव देखील गमवावा लागलेला आहे. तर धोकादायक वळणाजवळ वाहन ओव्हरटेक करताना अथवा ब्रेक नादुरुस्त झाल्याने देखील वाहनांचे अपघात घडतात. अशावेळी दोन वाहन चालकांमध्ये वाद देखील निर्माण होतो. असाच प्रकार शनिवारी सकाळी घडला.

ओव्हरटेक करतांना ट्रकचे नुकसान झाल्याने दोन्ही ट्रकच्या चालकांमध्ये जोरदार भांडण झाले. सुरुवातीला शाब्दीक चकमकीचे रुपांतर मारामारीत झाले. त्यातच दोघांपैकी कोणीही माघार घेण्यास तयार नसल्याने दोघांनीही घाटातील रस्त्यावरच वाहने जागेवर उभी केल्याने घाटात तब्बल पाऊण तास वाहतूक ठप्पा झाली होती.

दोन वाहनचालकामध्ये सुरू झालेले भांडण मिटवण्यासाठी काही ट्रक चालकांनी मध्यस्थी करत दोघांतील वाद मिटवून टाकले. त्यानंतर दोन्ही ट्रक समोपचाराने काढून घेतल्याने रस्ता मोकळा झाला. सुमारे पाऊण तास या वादामुळे महामार्गावर लांबपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

# सोयाबीन खरेदी करुन सव्वाचार लाखाची फसवणूक

## पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**● नेवासा । प्रतिनिधी–**

विक्री केलेल्या सोयाबीनची सव्वाचार लाखाहून अधिक रक्कम न देवून फसवणूक केल्याची फिर्याद नेवासा तालुक्यातील कांगोणी येथील शेतकऱ्याने दिली आहे. त्यावरुन शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात राहुरी तालुक्यातील फार्मर प्रोड्युसर कंपनीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आलाआहे.

याबाबत नेवासा तालुक्यातील कांगोणी येथील शेतकरी गोरक्षनाथ त्रिंबक साळके (वय ५३) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, कांगोणी शिवारात सन २०२३-२४ मध्ये सोयाबीनचे पिक घेतलेले होते. एकूण ८७ क्किंटल ४० किलो सोयाबीनचे पिक झालेले होते.

सदर सोयाबीन विकण्यासाठी ग्रीनअप फार्मर प्रोड्युसर कंपनी ब्राम्हणी (ता. राहुरी) या कंपनीचे व्यवस्थापक कविता हापसे यांचेशी दि. १६ एप्रिल २०२५ रोजी फोनवर बोलणे केले होते. त्यांनी ५००० रुपये क्किंटल प्रमाणे सोयाबीन घेवू असे सांगितले होते.

त्याप्रमाणे त्यांना सोयाबीन दिली. दि. १६ एप्रिल २०२५ रोजी ते आजपावेतो वेळोवेळी ग्रीनअप फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संचालक अर्जुन मच्छिंद्र ठुबे, अनिल रखमाजी हापसे, किरण चांगदेव कदम, छाया दत्तात्रय कातोरे, व्यवस्थापक कविता रमेश हापसे, कर्मचारी विठ्ठल छगन ठुबे (सर्व रा. ब्राह्मणी, ता. राहुरी) यांनी संगनमत करुन ४ लाख ३२ हजार ६५० रुपये रक्कम देतो असे म्हणून रक्कम दिली नाही व माझी आर्थिक फसवणूक केली.

या फिर्यादीवरुन अर्जुन मच्छिंद्र ठुबे, अनिल रखमाजी हापसे, किरण चांगदेव कदम, छाया दत्तात्रय कातोरे, कविता रमेश हापसे व विठ्ठल छगन ठुबे यांचे विरुद्ध शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार दत्तात्रय पवार हे पुढील तपास करीत आहेत.

# राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत नगरच्या विराज पिसाळ ने पटकाविले सुवर्णपदक

**● नगर । वीरभूमी–**

येथील खेळाडू विराज गजेंद्र पिसाळ याने उत्तराखंड येथे राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. विराज हा अहिल्यानगरचा तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशन व एकलव्य तायक्कांदो अकॅडमीचा खेळाडू असून, त्याने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून यश संपादन केले. येणाऱ्या एशियन युथ गेमसाठी विराजची भारतीय संघात नाव निश्चित होण्यास सर्वांच्या अपेक्षा लागल्या आहेत.

इंडिया तायक्कांदो या देशातील एकमेव अधिकृत राष्ट्रीय संघटनेच्या वतीने उत्तराखंड येथे २९ मे ते १ जून दरम्यान राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धा पार पडली. यामध्ये विराजने प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक पटकाविले. विराज केडगाव येथील एकलव्य तायक्कांदो अकॅडमीत मुख्य प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. अहिल्यानगर बार असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष अॅड. गजेंद्र पिसाळ व शिक्षिका



स्मिता पिसाळ यांचा तो मुलगा असून, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अंबादास पिसाळ यांचा नातू आहे.

या यशाबद्दल ग्रँड मास्टर अल्ताफ खान, एकलव्य तायक्कांदो अकॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते, तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. माणिकराव विधाते, महाराष्ट्र तायक्कांदो असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव घनश्याम सानप यांनी त्याचे अभिनंदन केले. तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफ्फार पठाण यांनी विराजला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# निळवंडे धरणाचे श्रेय फक्त स्व. मधुकरराव पिचड यांनाच

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । अकोले येथे स्व. मधुकरराव पिचड यांच्या पुतळ्याचे भूमिपुजन

**● अकोले । वीरभूमी–**

जलनायक म्हणून काही लोक मिरवत आहेत पण खरे जलनायक मधुकरराव पिचड हे असून निळवंडे धरणाच्या निर्मितीचे श्रेय खऱ्या अर्थाने त्यांनाच जाते आणि निळवंडेचे कालवे रखडले होते. परंतु मधुकरराव पिचड यांनी सकारात्मक भूमिका घेतली म्हणुनच आज उत्तर नगर जिल्ह्यातील गावातील शेतात पाणी गेले याचे सर्व श्रेय पिचड आणि पिचड यांनाच जाते ते कोण्ही घेऊ नये, असा टोला थोरात यांचे नाव न घेता राज्याचे जलसंपदा मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला आहे.

माजी मंत्री स्वर्गीय मधुकरराव पिचड यांच्या जयंती निमित्त अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी आणि अगस्ती कला वाणिज्य व दादासाहेब रुपवतें विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने नियोजित पुतळ्याचे भूमिपूजन समारंभ आयोजित करण्यात आला होता तसेच इयत्ता दहावीच्या बारावीच्या परीक्षेत विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी, पालक, शिक्षक यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



यावेळी विखे पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शेतकरी नेते तथा संस्थेचे माजी विश्वस्त दशरथराव सावंत हे होते.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी आमदार वैभवराव पिचड, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.संजीव सोनवणे, विश्वस्त गिरजाजी जाधव, स्वीकृत विश्वस्त सुरेश कोते, मधुकरराव सोनवणे, संपतराव वैद्य, अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, खजिनदार धनंजय संत, कार्यकारणी सदस्य यशवंतराव आभाळे, सुधाकरराव आरोटे, डॉ. डी. के. सहाणे, श्रीमती कल्पनाताई सुरपुरिया, रमेशराव जगताप, मच्छिंद्र धुमाळ, शिक्षण अधिकारी संपत मालुंजकर, आदर्श सरपंच हेमलताताई पिचड, सौ. पूनमताई पिचड, मोहिनी पिचड, प्रियंका पिचड, डॉ. मधुरा पिचड, गिरीजा पिचड, राधिका पिचड, यश पिचड, ओम पिचड, संस्थेचे सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ना. विखे पाटील बोलताना म्हणाले की, आजचा कार्यक्रम हा आगळा वेगळा आहे. ज्या मधुकरराव पिचड यांनी आदिवासींच्या जीवनात आमूलाग्र बदल केला. अकोले तालुक्यातील विकासाचा पाया घातला, विकासाची मंदिरे उभी केली. कुठलेही राजकीय पाठबळ नसताना राज्याच्या राजकारणात ठसा उमटवला. पंचायत समितीच्या सभापती पदापासून ते राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून आणि विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी काम केले. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी, तत्वांसाठी संघर्ष केला, डगमगले नाही. नैतिक मूल्ये जपली. निळवंडे सारखे प्रकल्प फक्त त्यांच्या आणि त्यांच्या मुळेच झाले. ते खरे जलनायक आहेत. आधी पुनर्वसन मग धरण अशी भूमिका घेतली शेवटी सरकारलाच ही भूमिका घ्यावी लागली. धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लागले म्हणून हे धरण होऊ शकले. असेही ते म्हणाले.

यावेळी माजी आमदार वैभवराव पिचड, कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे, कार्यकारिणी सदस्य यशवंतराव आभाळे कार्यक्रमाचे अध्यक्ष, संस्थेचे माजी विश्वस्त दशरथराव सावंत यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. स्वागत व प्रास्तविक कार्यकारणी सदस्य शरदराव देशमुख यांनी केले. तर सूत्रसंचलन प्रा. सुप्रिया वैद्य व प्रा. कोमल राठी यांनी केले.

### मतभेद पण मनभेद नाही

■ मधुकरराव पिचड आणि आमचे दोन पिढ्यांचे नाते असून त्यांचा आणि आमचा ऋणानुबंध राहिला आहे. राजकारणात त्यांचे आणि आमचे अनेकदा मतभेद झाले पण ते तात्विक होते मनभेद कधी नव्हते. ते आमच्या साठी पितृतुल्य होते, असेही मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

### उदंड झाले शिक्षण तज्ञ.. विचारवंत...

■ येणारा काळ हा संघर्षाचा आहे.येणाऱ्या बदलावर राज्यातील विद्यापीठे पुढे जायला तयार नाही. एक एक अभ्यासक्रम बदलायला दहा - दहा वर्षे लागतात. फंडामेंटल रिसर्च हे कालबाह्य झाले आहे.त्याच्यावर विचारमंथन करण्याची गरज आहे. बदलत्या काळानुसार शिक्षण पद्धती शाळेतच बदल्या पाहिजेत. याचा विचार विनिमय होणे गरजेचे आहे. परंतु आपल्या कडे शिक्षण तज्ञ आणि विचारवंतत उदंड झालेत, अशी खोचक टीका मंत्री विखे पाटील यांनी केली.

